# -: निवेदन :-

पिंपरी चिंचवड महानगरपालिका आस्थापनेवरील कनिष्ठ अभियंता स्थापत्य, स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक व सर्व्हेअर या संवर्गातील पदे भरणेकरिता दिनांक 29/3/2015 रोजी घेणेत आलेल्या लेखी परीक्षेचा निकाल दिनांक 20/4/2015 रोजी महापालिकेच्या www.pcmcindia.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करणेत आला आहे.

उपरोक्त पदांची निवड व प्रतिक्षा यादी तयार करणेपूर्वी, गुणानुक्रमे संभाव्य निवड क्षेत्रात येणा-या **(Zone Of Consideration)** उमेदवारांचे वय, शैक्षणिक अर्हता, अनुभव,जाती प्रवर्ग व समांतर आरक्षण इत्यादि विषयक कागदपत्रांची तपासणी होणे आवश्यक आहे. तरी सर्व्हेअर पदासाठी कागदपत्रे तपासणी करिता उमेदवारांची यादी सोबतचे परिशिष्ट "क " मध्ये महापालिकेच्या **www.pcmcindia.gov.in** या संकेतस्थळावर प्रसिध्द करणेत येत आहे. सदर उमेदवारांनी त्यांचे नावांसमोर नमूद केलेल्या दिनांकास कागदपत्रे तपासणीसाठी प्रशासन विभागात सकाळी 10.30 वाजता उपस्थित रहावे. उमेदवारांनी कागदपत्रे तपासणी करता येताना परिशिष्ट "ड " मध्ये नमूद केल्याप्रमाणे मूळ कागदपत्रे तसेच कागदपत्रांचा साक्षांकित प्रतीचा एक संच बरोबर आणावा. कागदपत्रांच्या साक्षांकीत प्रती या सक्षम प्राधिका-याने साक्षांकीत केलेल्या असाव्यात.

कागदपत्रे तपासणीचेवेळी उमेदवारांनी अपूर्ण कागदपत्रे सादर केल्यास अथवा कागदपत्रे तपासणी अंती उमेदवार शैक्षणिक अर्हता तसेच इतर बाबींची पुर्तता करीत नसल्याचे दिसून आल्यास अशा उमेदवारांचा पुढील निवडीसाठी विचार केला जाणार नाही.

आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी 18

क्र.प्रशासन/3/कावि/532/2015
दिनांक 13/05/2015

**पिंपरी चिंचवड महानगरपालिका,**
**पिंपरी 411 018**

**सर्व्हेअर**
**परिशिष्ट - "क"**

| अ.क्र. | परीक्षा क्रमांक | उमेदवाराचे नाव | लेखी परीक्षा गुण | प्रवर्ग | कागदपत्रे तपासणीचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|
| | | **अनुसूचित जाती** | | | |
| 1 | 10095 | KAMBLE BALAJI SOPAN | 148 | अनुसूचित जाती (-) | 28/05/2015 |
| 2 | 10048 | WAGHMARE JAYDEV BHANUDAS | 148 | अनुसूचित जाती (-) | 28/05/2015 |
| 3 | 10040 | ALHAT ADESH GAUTAM | 128 | अनुसूचित जाती (-) | 28/05/2015 |
| | | **अनुसूचित जमाती** | | | |
| 1 | 10097 | BAMBLE PRAVIN DEVRAM | 130 | अनुसूचित जमाती (-) | 28/05/2015 |
| 2 | 10110 | KOLAP SACHIN BUDHARAM | 126 | अनुसूचित जमाती (-) | 28/05/2015 |
| 3 | 10074 | KARBHAL SITARAM UMANATH | 120 | अनुसूचित जमाती (-) | 28/05/2015 |

आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी 411018

## पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी 18
### परिशिष्ट "ड"
### कनिष्ठ अभियंता स्थापत्य, स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक व सर्व्हेअर पदाकरिता कागदपत्रे तपासणीसाठी आणावयाच्या कागदपत्रांची यादी

| अ.क्र. | बाब | आणावयाची कागदपत्रे | शेरा |
|---|---|---|---|
| 1 | वय | सक्षम प्राधिका-याने दिलेला जन्माचा दाखला/ शाळा सोडल्याचा दाखला/एस.एस.परीक्षा उत्तीर्ण प्रमाणपत्र/ वय व अधिवासाबाबत शासनाकडील सक्षम प्राधिका-यांने दिलेले प्रमाणपत्र. | सर्व पदांसाठी |
| 2 | परीक्षा शुल्क | बॅन्केत परीक्षा शुल्क भरल्याबाबतचे चलन | सर्व पदांसाठी |
| 3 | अर्ज | ऑनलाईन केलेल्या अर्जाची प्रत | सर्व पदांसाठी |
| 4 | शैक्षणिक अर्हता | एस.एस.सी परीक्षा उत्तीर्ण गुणपत्रक व प्रमाणपत्र | सर्व पदांसाठी |
| | | एच.एस.सी परीक्षा उत्तीर्ण गुणपत्रक व प्रमाणपत्र | सर्व पदांसाठी |
| | | महाराष्ट्रातील मान्यताप्राप्त विद्यापीठाकडील शासकीय स्थापत्य अभियांत्रिकी मधील पदवी किंवा पदविका उत्तीर्ण झाल्याची गुणपत्रके व प्रमाणपत्र | कनिष्ठ अभियंता स्थापत्य व स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक पदासाठी |
| | | शासनमान्य औद्योगिक प्रशिक्षण केंद्र अथवा संस्थेकडील स्थापत्य सहाय्यक (सिव्हील इंजिनियरिंग असिस्टंन्ट) कोर्स उत्तीर्ण असल्याचे गुणपत्रक तसेच प्रमाणपत्र.<br>2 वर्ष कामाचा अनुभवाचे प्रमाणपत्र | स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक पदासाठी |
| | | शासनमान्य संस्थेकडील सर्व्हेअर कोर्स उत्तीर्ण असल्याबाबत प्रमाणपत्र | सर्व्हेअर पदासाठी |
| 9 | जाती प्रमाणपत्र/ | अनु.जाती, अनु.जमाती, वि.जा (अ), भ.ज (ब), भ.ज (क), भ.ज (ड), वि.मा.प्र, इ.मा.व प्रवर्गातील उमेदवारांसाठी सक्षम प्राधिका-याने निर्गमीत केलेले जातीचे प्रमाणपत्र तसेच उपलब्ध असल्यास जात वैधता प्रमाणपत्र. | सर्व पदांसाठी |
| 10 | नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र | वि.जा (अ), भ.ज (ब), भ.ज (क), भ.ज (ड), वि.मा.प्र, इ.मा.व प्रवर्गातील सर्व उमेदवार, खुल्या प्रवर्गातील महिला आरक्षणातील उमेदवार यांनी सक्षम प्राधिका-याचे दिनांक 31/3/2015 पर्यंत वैध असलेले नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र.<br>विवाहित स्त्रीयांचे बाबतीत पूर्वाश्रमीच्या नावाने जातीचे व नॉन क्रिमीलेअरचे प्रमाणपत्र. | सर्व पदांसाठी |
| 11 | विवाह नोंदणी प्रमाणपत्र किंवा नावांत बदल केल्याबाबत राजपत्राची प्रत | विवाहित स्त्री उमेदवारांनी विवाह निबंधक यांनी दिलेले विवाह नोंदणी प्रमाणपत्र/दाखला किंवा नावांत बदल केल्याबाबतचे अधिसूचीत राजपत्र. | सर्व पदांसाठी |
| 12 | अपंग आरक्षण | नि:समर्थ व्यक्ती (अपंग) उमेदवारांनी आरक्षणाचे लाभासाठी किमान 40 टक्के अपंगत्व असल्याचे मा.जिल्हा शल्य चिकीत्सक यांचेकडील प्रमाणपत्र . | सर्व पदांसाठी |
| 13 | खेळाडू | जाहिरातीसोबतचे सूचनापत्रामध्ये नमूद केल्याप्रमाणे खेळ विषयक अर्हता धारण करीत असलेची प्रमाणपत्रे. | सर्व पदांसाठी |
| 14 | माजी सैनिक | सैनिकी सेवेतून निवृत्त होतानाचे डिसचार्ज कार्ड.<br>जिल्हा सैनिक कल्याण मंडळाकडील नोंदणी प्रमाणपत्र. | सर्व पदांसाठी |
| 15 | प्रकल्पग्रस्त/भूकंपग्रस्त | सक्षम शासकीय प्राधिका-याने प्रकल्पग्रस्त/भूकंपग्रस्त असल्याबाबत दिलेला दाखला/प्रमाणपत्र. | सर्व पदांसाठी |
| 16 | अंशकालीन उमेदवार | सुशिक्षीत बेरोजगारांना अर्थसहाय्य या योजनेअंतर्गत शासकीय कार्यालयांमध्ये तीन वर्षे अंशकालीन काम केल्याचे व रोजगार व मार्गदर्शन केंद्रामध्ये या अनुभवाची नोंद केल्याचे प्रमाणपत्र. | सर्व पदांसाठी |

आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी 18